# संरक्षण सेवेमध्ये अधिकारी होण्याची महाराष्ट्रातील युवकांना सुवर्ण संधी

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**Gateway To Defence Career**

महाराष्ट्र शासन

sanchalakspi@gmail.com
www.spiaurangabad.com

मोबईल/दुरध्वनी
७२१८६६८२५०/०२४०-२३८१३७०

# SPI

## SERVICES PREPARATORY INSTITUTE, N-12 SECTOR, CIDCO, AURANGABAD

सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, एन-१२, सिडको, औरंगाबाद

१. <u>सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था,(एस.पी.आय.)औरंगाबाद</u> :- संरक्षण सेवेमध्ये अधिकारी म्हणून महाराष्ट्रातील युवकांना जास्तीतजास्त संख्येने जाता यावे आणि त्यासाठी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या (एन.डी.ए.) स्पर्धात्मक परीक्षा आणि मुलाखत यांची तयारी करवून घेण्याच्या दृष्टीने पात्र उमेदवारांसाठी, औरंगाबाद येथे सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्थेची (एस.पी.आय.) स्थापना महाराष्ट्र शासनाने केलेली आहे.

२. <u>पात्रता</u> :- अविवाहित (मुलगा) उमेदवार महाराष्ट्राचा अधिवासी (Domicile) असला पाहिज. जन्म तारीख ०२ जूलै २००३ ते ३१ डिसेंबर २००५ च्या दरम्यान असावा. तो मार्च/एप्रिल २०२० मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालांत परीक्षेला बसणारा असला पाहिजे आणि जुन-२०२० मध्ये इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेण्यासाठी पात्र असावा.

३. <u>शारिरीक पात्रता</u> :- उंची-१५७ से.मी. वजन-४३ कि.ग्रा. छाती न फुगवता-७४ से.मी. फुगवून -७९ से.मी. दृष्टी-चष्मा लावून जास्तीत-जास्त ६/९, तसेच रंगांधळेपणा नसावा. लाल व हिरवा रंग ओळखता आला पाहिजे. सैन्यदलात अधिकारी बनण्यासाठी दिलेल्या सर्व निकषांसाठी पात्र असावा.

४. <u>लेखी परीक्षा आणि मुलाखत</u> :- पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा इंग्रजी माध्यमातून एप्रिल/मे २०२० मध्ये औरंगाबाद, कोल्हापूर, पुणे आणि नागपूर केद्रांवर घेतली जाईल. परीक्षा Multiple choice questions (MCQ) वर आधारित असेल. परीक्षा एकूण १५० मार्कांची असेल. (गणित (Mathematics) ७५ मार्क आणि सामान्यज्ञान General Ability Test(GAT) ७५ मार्क). लेखी परीक्षा ही इयत्ता ८ वी ते १० वीच्या स्टेट बोर्ड व सी.बी.एस.ई. च्या अभ्यास क्रमावर अधारीत असेल. प्रत्येक योग्य उत्तराला (१) गुण मिळेल व प्रत्येकी चुकीच्या उत्तराला (०.५) गुण वजा केले जातील. सविस्तर माहितीसाठी संस्थेचे संकेतस्थळ (Website) www.spiaurangabad.com पहावे.

५. ऑनलाईन अर्ज www.spiaurangabad.com या संकेत स्थळावर उपलब्ध करून दिलेला आहे. इच्छुक उमेदवारांनी संकेत स्थळावर अर्ज भरावा. परीक्षा शुल्क रूपये ४५०/- ऑनलाईन फक्त क्रेडीट कार्ड, डेबिट कार्ड किंवा नेट बँकीग इत्यादी व्दारे भरावे. डिमांड ड्राफ्ट किवा चलान व्दारे भरलेले परीक्षा शुल्क स्विकारले जाणार नाही.

६. <u>प्रवेश अर्ज स्विकारण्याची शेवटची तारीख</u> : १५ फेब्रुवारी २०२०.

७. <u>हॉल तिकीट</u> : लेखी परीक्षेचे हॉल तिकीट दिनांक १५ मार्च २०२० नंतर संस्थेच्या संकेत स्थळावरून प्राप्त करून घ्यावे. लेखी परीक्षेचे हॉल तिकीट प्राप्त न झाल्यास ( १०.०० ते १७.३०) या वेळेत संस्थेच्या दुरध्वनी क्रमांकावर <u>सोमवार ते शुक्रवार</u> दरम्यान चौकशी करावी.

८. प्रवेश अर्ज संस्थेच्या अटी व शर्ती नुसार भरलेला नसल्यास अर्जासोबत भरेलेली प्रवेश शुल्काची रक्कम परत मिळणार नाही.

(अमित रा दळवी)
कर्नल (निवृत्त)
संचालक